## पेण तालुक्यातील मौजे डोलवी येथील वाळू डेपोमधील शिल्लक वाळूसाठा निर्गतीकरीता ई-निविदेसह ई-लिलाव (सन २०२६-२०२७)

---

### सर्वसाधारण माहिती

ई-निविदासह ई-लिलाव प्रक्रीयेची सविस्तर माहिती **http://maharashtra.gov.in** तसेच **www.raigad** या संकेतस्थळावर (वेबसाईटवर) प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच इच्छुक व्यक्तींना / संस्थांना या प्रक्रीयेमध्ये भाग घेण्यासाठी विनंती करण्यात येत आहे. या प्रक्रीयेची सविस्तर माहिती घेणेकामी **www.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर (वेबसाईटवर ) प्रसिध्द करण्यात आली आहे.

तसेच मा.जिल्हाधिकारी सो.रायगड-अलिबाग यांचेकडील पत्र क्र.खशा/कात-१/वाळू धोरण/वाळू व डेपोबाबत/२०२५, दि. २३/०७/२०२५ अन्वये ज्या वाळू डेपोचा मंजूर कालावधी समाप्त झाला आहे किंवा समाप्त होणार आहे, त्या वाळू डेपोमध्ये मंजूर कालावधी समाप्त होण्यापूर्वी उत्खनन करून वाळू डेपोमध्ये साठवणूक केलेली परंतु विक्री न झालेली वाळू, वाळू डेपोमधून विक्री केलेली परंतु ग्राहकांनी विहीत मुदतीमध्ये वाळूची उचल न केलेली वाळू तंतोतंत परिमाणाचे वजन करणे शक्य न झाल्याने वजनामधील घट-तूटीनुसार शिल्लक वाळू विल्हेवाटीबाबत लिलावाद्वारे विल्हेवाट लावण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मौजे डोलवी या डेपोच्या निविदाधारकांने उत्खनन, वाहतूक इत्यादीसाठी निविदेत नमुद केलेला दर रु. २४५०+GST (रु.२८९१/- प्रती ब्रास) असा आहे. सदर दर हातची किमंत म्हणून ग्राहय धरून लँडीग पॉईंटवर व डेपोमध्ये शिल्लक असलेल्या वाळूचा लिलाव करावयाचा आहे. लिलाव झालेल्या संपुर्ण वाळूची नोंद महाखनिज प्रणालीवर घेण्यात येईल. त्याप्रमाणे लिलाव प्रक्रीयेची सविस्तर माहिती https://mahatenders.gov.in तसेच **www.raigad.gov.in** या संकेतस्थळावर (वेबसाईटवर ) प्रसिध्द करण्यात आली आहे.

| अ.क्र. | बाब | तपशिल |
|---|---|---|
| १ | कामाचेनाव | पेण तालुक्यातील मौजे डोलवी, ता. पेण, जि.रायगड या डेपोमधील शिल्लक वाळूसाठा अधिकृत समजण्यात येवून, डेपोमध्ये विक्रीसाठी शिल्लक २५०७ ब्रास वाळूसाठा निर्गतीबाबत. |
| २ | अनामत रक्कम | ई निविदेसोबत रक्कम रु. ५०००/- (अक्षरी र.रु. पाच हजार मात्र) इतकी रक्कम ऑनलाईन पध्दतीने भरावी लागते. |
| ३ | ऑनलाईन रजिस्ट्रेश, ई-निविदा खरेदी करणे व ई -निविदा भरणे | दिनांक २२/०४/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजल्यापासून प्रक्रीयेमध्ये भाग घेऊ इच्छिणाऱ्या व्यक्ती/संस्था/कंपनीचे ऑनलाईन रजिस्ट्रेशन, ई-निविदा खरेदी व ई निविदा भरणे सुरू होईल. |
| ४ | ई निविदा ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्याचा / भरण्याचा अंतिम दिनांक व वेळ | दिनांक ०६/०५/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता ऑनलाईन रजिस्ट्रेशन, ई निवीदा खरेदी करणे बंद होईल. |
| ५ | ई निविदा उघडण्याची तारीख व वेळ | दिनांक ०९/०५/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता ई निविदा डाऊनलोड करून उघडण्यात येईल. |
| ६ | निविदा उघडण्याचे ठिकाण | उपविभागीय अधिकारी कार्यालय पेण |
| ७ | लिलावपूर्व (Pre-Bid) बैठक | ई निविदा प्रक्रीयेमध्ये भाग घेऊ इच्छिणाऱ्या ठेकेदारांची लिलाव पूर्व (Pre-Bid) बैठक दिनांक ०४/०५/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता, स्थळ - उपविभागीय अधिकारी कार्यालय पेण |
| ८ | प्रत्यक्ष लिलावाचा दिनांक व वेळ | दि. ०६/०५/२०२६ रोजी वेळ सकाळी ११.०० वाजले पासून ते सायं. ६.०० वाजेपर्यंत |

१. ई निविदा तांत्रिक सहयोगी mahatenders यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

२. ई-निविदा प्रक्रीयेमध्ये सर्व माहिती, वाळू/रेती उपगटाचा तपशील, सोबतचे परिशिष्ठ अ आणि निविदा प्रक्रीया अटी व शर्ती यांची सविस्तर माहिती https://mahatenders.gov.in तसेच www.raigad.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे.

३. निविदा धारकांनी निविदा अर्ज www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर भरणे आवश्यक आहे. तसेच प्रत्यक्षात संकेतस्थळावर भरण्यात आलेली कागदपत्रे व ऑनलाईन भरण्यात आलेली कागदपत्रे व ऑनलाईन भरण्यात आलेली निविदा शुल्क व अनामत रक्कम यांची पोच पावती खनिकर्म शाखेकडे विहित मुदतीत सादर केले जातील अशाच निविदाधारकांचा अर्जाचा विचार केला जाईल यांची सर्व निविदा धारकांनी नोंद घ्यावी.

४. ई- निविदा प्रक्रीयेत भाग घेण्यासाठी मागील ३ वर्षाची आयकर विवरणपत्रे, पॅनकार्ड, जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र व निविदेतील अटी / शर्ती मान्य असल्याबाबत हमीपत्र देणे बंधनकारक राहील.

५. ई-निविदा प्रक्रीयेत भाग घेऊ इच्छिणाऱ्यास प्रत्येक वाळू/रेती गटासाठी/ साठयासाठी पुढील प्रमाणे ना परतावा शुल्क ऑनलाईन पध्दतीने अदा करावे लागेल. फॉर्म फी प्रत्येक वाळू/रेती गटाकरीता स्वतंत्र रु. २०००/- (१० लाखापर्यंत अपसेट प्राईझ असलेल्या वाळू साठयाकरीता) व र.रु.५०००/- (१० लाखापेक्षा जास्त अपसेट प्राईझ असलेल्या वाळू साठयाकरीता)

६. ई-निवीदेच्या सूचना, आवश्यक पात्रता,सर्वसाधारण अटी/शर्ती व इतर तपशिल निवीदा दस्तऐवजामध्ये पाहता येतील.

७. प्राप्त निविदा कारणे न देता अथवा स्विकारणेचे अधिकार उपविभागीय अधिकारी पेण यांनी स्वतःकडे राखुन ठेवले आहे.

८. ई-निविदामधील अटी व शर्ती ऑनलाईन पोर्टल www.mahatenders.gov.in वर देण्यात आलेले आहेत.

९. सदरची निविदा कोणत्याही किमान कामाचा हक्क प्रस्तापित करत नाही.

१०. ई-निविदा प्रक्रियेबाबत कोणत्याही अडचणी आल्यास ०२१४३-२५२०३६ या क्रमांकावर संपर्क साधता येईल.

क्र. - जमीनबाब/निविदर/शिल्लक वाळू/वाळू रेती धोरण-२५/रायगड/२०२६
दिनांक -२१/०४/२०२६

ठिकाण - पेण

(प्रवीण ज्ञानू पवार)
उपविभागीय अधिकारी
पेण, उपविभाग पेण

Signature Not Verified
Digitally signed by PRIYA NITIN SHINDE
Date: 2026.04.22 12:22:53 IST
Location: Maharashtra-MH